॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

अहिल्यानगर ▪ बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ ▪ वर्ष ७ वे ▪ अंक ८३ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ▪ 9420802145 ▪ www.veerbhuminews.com

✲ सुविचार ✲

मन खंबीर असेल तर कोणतेही संकट लहान वाटते.

## फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### क्रेडिट कार्ड

इकडे आड तिकडे विहीर
प्रत्येकाची लागते शाळा
अलगद गळ्याशी लागतो
क्रेडिट कार्डचा सापळा

एकामागून एक हप्ता
अस्थिरतेचा सोहळा
न संपणार चक्र हे
थोडं सावध चाल बाळा

## SPOT NEWS

### आणखी १५ दिवस पावसाची शक्यता धूसर!

**नागपूर** – राज्यभरात बळीराजा पावसाच्या प्रतिक्षेत आहे. मात्र, पुढची १५ दिवस विदर्भात मान्सूनच्या पावसाची शक्यता नसल्याने शेतक-यांनी मान्सूनच्या पावसाची वाट न पाहता सिंचनाच्या पर्यायी उपाययोजनेवर लक्ष केंद्रित करावे, असा सल्ला नागपूर वेधशाळेने दिला आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला की, विदर्भात मान्सूनचा पाऊस कोसळतो. मात्र, सध्या पुढील काही दिवस बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याची शक्यता दिसत नसल्याची माहिती नागपूर वेधशाळेचे वैज्ञानिक प्रवीण कुमार यांनी दिली. सध्या अल निनोचा प्रभाव कायम असून सप्टेंबर महिन्यातही सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद होण्याची शक्यता आहे. स्थानिक वातावरणीय परिस्थितीमुळे छोट्या छोट्या भागात पाऊस पडेल. पण मान्सूनच्या सक्रिय पावसाची सध्या २ आठवडे शक्यता नसल्याचे प्रवीण कुमार यांनी सांगितले. पुढच्या काही दिवसांमध्ये पावसाची खूप कमी शक्यता आहे. कारण पुढील काही दिवस बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याची शक्यता दिसत नाही.

### यूपीआयद्वारे २ हजारांवर व्यवहार केल्यास ०.४ टक्के शुल्क

**नवी दिल्ली** – केंद्र सरकारने यूपीआयवर एमडीआर अर्थात मर्चंट डिस्काऊंट रेट लागू करण्याची घोषणा केली आहे. आज यूपीआय संचालन समितीची बैठक झाली. यात २ हजार रुपयांपेक्षा जास्तीचा व्यवहार केल्यास ०.४ टक्के शुल्क द्यावे लागणार आहे. १५ ऑक्टोबरपासून निर्धारित मर्चंट व्यवहारांवर एमडीआर लागू होणार आहे. दरम्यान, यूपीआयच्या एमडीआरमधून सामान्य लोक आणि छोट्या व्यापाऱ्यांना वगळण्यात आल्याचे सांगण्यात आले.

# जरांगे पाटलांची मुंबईकडे कूच

## शासनाकडून पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नसल्याने आझाद मैदानावर आंदोलनाची तयारी

**जालना । वीरभूमी–**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आपल्या मागण्यांसाठी गेल्या १७ दिवसांपासून उपोषण करत आहेत. मात्र, शासनाकडून पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नसल्याने त्यांनी आता मुंबईकडे कूच केली आहे. अंतरवाली सराटीतून आज त्यांनी आपला मोर्चा मुंबईकडे वळवला असून आझाद मैदानात ते उपोषणाला बसणार आहेत. यापूर्वी दोनवेळा मुंबई पोलिसांनी जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनाला परवानगी नाकारली. तरीही नियोजित दौऱ्यानुसार जरांगे पाटील यांनी मुंबईकडे कूच केली. दरम्यान, अंतरवाली सराटी येथून निघताना मनोज जरांगे पाटील भावूक झाले. गाडीत बसताच त्यांना अश्रू अनावर झाले. यावेळी त्यांनी समाजाच्या लेकरांसाठी लढत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

जरांगे पाटील अंतरवाली सराटीमधून निघताना त्यांच्यासोबत त्यांचे मोजके समर्थक, दोन गाड्या आणि दोन रुग्णवाहिका होत्या. निघण्यापूर्वी डॉक्टरांनी त्यांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना उपचार घेण्याची विनंती केली होती, परंतु त्यांनी उपचार घेण्यास स्पष्ट नकार दिला आणि ते डिफेंडर गाडीतून मुंबईच्या दिशेने रवाना झाले. यावेळी अंतरवालीत समर्थकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.



तत्पूर्वी त्यांनी समाजाच्या लेकरांपेक्षा मला मोठे काय आहे, त्यांच्या कल्याणासाठी मी जात आहे. सरकारला वाटत आहे की, मी त्यांना शरण यावे. पण समाजाच्या लेकराला अर्धवट सोडून मी समाजाला धोका देऊ शकत नाही. मला ते मारून टाकणार आहेत, म्हणून मी आझाद मैदानावर जात आहे. मी माझ्या समाजाला त्रास होऊ देणार नाही. मी लढून मरेल, असे जरांगे म्हणाले. न्यायदेवतेवर आपण विश्वास ठेवायचा आणि तीच परवानगी समजायची. माझे सगळ्यांना आवाहन आहे की, शांत राहा. तुमच्या लेकरांसाठी मी लढेन. मी जिवंत असो की नसो तुम्ही समाज मोठा करा, असे जरांगे पाटील म्हणाले.

मुंबईतील आंदोलनासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या वतीने मुंबई पोलिसांकडे पुन्हा अर्ज दाखल करण्यात आला. यापूर्वी दोन वेळा परवानगी नाकारण्यात आल्यानंतर तिसऱ्यांदा अर्ज करण्यात आला. या अर्जामध्ये ५० जणांना आंदोलन करण्याची परवानगी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. नव्या अर्जात आंदोलनासाठी घालण्यात येणाऱ्या सर्व नियम आणि अटींचे पालन केले जाईल, असे नमूद केले आहे. तसेच १८ सप्टेंबर रोजी ठरवून दिलेल्या वेळेतच आंदोलन करण्यात येईल, असेही पत्रात नमूद केले आहे.

जरांगे पाटील यांना आंदोलनासाठी परवानगी मिळण्याची शक्यता कमी असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. गणेशोत्सवास परवानगी दिल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू शकतो. पोलिसांवर याचा ताण पडण्याची शक्यता असल्याने जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पोलिसांकडून परवानगी मिळण्याची शक्यता कमी आहे.

मी मुंबईला जात आहे. तुम्ही आशीर्वाद द्यायला या. मला मारायचे तर मारू द्या. मी आरक्षण घेतल्याशिवाय राहणार नाही. पायात आणि पोटात आग होते, असे जरांगे पाटील म्हणाले.

मनोज जरांगे पाटील यांना अश्रू अनावर झाले. मी अंमलबजावणी करायला लावल्याशिवाय आता थांबणार नाही. मारू द्या मारले तर मी आझाद मैदानातच बसणार आहे, असे मनोज जरांगे यांनी सांगितले.

## भंडारदरा धरणातून आवर्तन सुरू

**अकोले । वीरभूमी–**

भंडारदरा धरणात कमी प्रमाणात पाण्याची आवक सुरू झाल्याने रविवारी सायंकाळी ११०३९ क्षमतेच्या धरणातून ३१४७ क्युसेकने विसर्ग सोडण्यात आले आहे. आज ८५० क्यूसेक ने विसर्ग सोडण्यात आले.धरण पूर्ण क्षमतेने भरलेले असल्याने जशी आवक होत आहे. त्याप्रमाणात प्रवरा नदीपात्रात सोडण्यात येत आहे. पाऊस वाढल्यास विसर्गही वाढविण्यात येणार आहे.

निळवंडे धरणात ८३२४ दलघफू पाणी असून २३५७क्युसेकने विसर्ग प्रवरा नदीत सोडण्यात आले होते,आज विसर्ग १३०० ने सोडण्यात आले आहे. वाकी तलावातही आवक होत असल्याने या तलावातून १९७क्युसेकने पुन्हा विसर्ग सुरू झाला आहे.

मुळा पाणलोटातही पाऊस मुळा पाणलोटातही शनिवारपासून हलकासा पाऊस सुरू सुरू झाला आहे. त्यामुळे मुळा नदीतील विसर्ग काहीसा वाढला आहे. २६००० दलघफू क्षमतेच्या या धरणांत २३०४९ दलघफू (८८.६५ टक्के) साठा असून कोतूळ येथे मुळा नदीचा ६२५ क्युसेक होता. भंडारदरा लाभक्षेत्रातील शेतकर्यांच्या मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रवरा डाव्या आणि उजव्या कालव्यातून खरीपाचे आवर्तन सोडण्याच्या सूचना जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विभागाच्या अधिकार्यांना दिल्या. लाभक्षेत्रात

यंदाच्या वर्षी सरासरीइतका पाऊस न झाल्यामुळे खरीप पिके धोक्यात आली आहेत. त्यामुळे शेती पिकांसाठी तसेच काही गावांमधील पाणीपुरवठा योजनांना पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने आवर्तन सुरू करावे, अशी मागणी लोकप्रतिनिधींसह शेतकर्यांनी जलसंपदामंत्री विखे पाटील यांच्याकडे केली होती. मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात टंचाई आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीतही प्रामुख्याने खरीप पिकांना जीवदान मिळावे म्हणून आवर्तनाच्या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली होती. धरणातील उपलब्ध पाण्याचा आढावा घेऊन आवर्तन सोडण्यात आहे आहे.

## हरेगाव मळ्याच्या खंडकरी शेतकऱ्यांना जमिनी परत मिळणार

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

जिल्ह्यातील हरेगाव मळा (ता. श्रीरामपूर) येथील शेती महामंडळाकडील जमिनी मूळ शेतकऱ्यांना किंवा त्यांच्या वारसांना परत करण्यासाठी महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ मध्ये सुधारणा करण्यास आज मंत्रिमंडळ बैठकीस मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. त्यानुसार याबाबत विधि व न्याय विभागाच्या सल्ल्याने अध्यादेश काढण्यात येणार

हरेगाव येथील या जमिनी ब्रिटीश सरकारने १०४ वर्षांपूर्वी सिंचन सुविधा विकासाठी ताब्यात घेतल्या होत्या. पण त्या द बेलापूर कंपनी लिमिटेड यांना भाडेपट्ट्यावर दिल्या होत्या. त्यानंतर महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ अस्तित्वात आल्यानंतर या कंपनीकडील ७ हजार ३७७ एकर १२ गुंठे पैकी ६ हजार ४२५ एकर १७ गुंठे जमीन अतिरिक्त ठरवून शासनाने ती महाराष्ट्र शेती महामंडळाकडे वर्ग केली होती. यापैकी आपल्या जमिनी परत मिळाव्या यासाठी मूळ शेतकऱ्यांनी आणि त्यांच्या वारसांनी न्यायालयात धाव घेतली होती.

मूळ शेतकऱ्यांना किंवा त्यांच्या वारसांना परत करण्यासाठी महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ मधील कलम २८-१ एए नुसार कार्यवाही करता येत नाही. त्यामुळे सिलिंग कायद्यात सुधारणा करण्यात यावी, असे महसूल मंत्रालयाने प्रस्तावित केले होते. त्यानुसार कलम २८-१ एए मधील पोटकलम ३ मध्ये नवीन पोटकलम ३-१ब समावेश करण्याचा प्रस्ताव विधि व न्याय विभागाकडे दाखल करण्यात आला होता.

त्या प्रस्तावास विधि व न्याय विभागाने मान्यता देऊन सुधारणा करण्यास सहमती दर्शवली आहे. यामुळे या जमिनी भोगवटादार वर्ग-२ म्हणून मूळ मालकांना किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना परत देण्याचा अधिकार राज्य शासनाला मिळणार आहे. त्यानुसार अधिनियमातील दुरूस्तीचा अध्यादेश काढण्यात येणार आहे.

## सहकारी साखर कारखान्यांसाठी सॉफ्ट लोन योजना

### थकीत एफआरपी, गाळप हंगाम पूर्वतयारीसाठी मिळणार निधी

**मुंबई । वीरभूमी–**

ऊस उत्पादक शेतकरी व साखर कारखान्यांना दिलासा मिळावा यासाठी राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना २०२५-२६ च्या गाळप हंगामातील थकीत एफआरपीची रक्कम देण्यासाठी आणि आगामी २०२६-२७च्या गाळप हंगामातील पूर्वतयारीसाठी निधी उपलब्ध व्हावा याकरिता सॉफ्ट लोन योजनेस आणि त्यासाठीच्या अंदाजित ७३८.५१ कोटी रुपयांच्या व्याज अनुदानास आज मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राज्यात २०२५-२६ मधील गाळप हंगामात १०२ सहकारी साखर कारखान्यांनी ५२७.५१ लाख मे.टन ऊस गाळप केले आहे. मात्र साखर कारखान्यांची आर्थिक परिस्थिती विचारात घेता शेतकऱ्यांना एफआरपीची रक्कम देण्यासाठी आणि पुढील हंगामाच्या पूर्वतयारीसाठी निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता होती. त्यानुसार या योजनेस मान्यता देण्यात आली. यापूर्वी २०१५ व २०१९ मध्ये सॉफ्ट लोन योजना जाहीर केल्या होत्या. या योजनांमध्ये वित्तीय संस्थांनी साखर कारखान्यांना दिलेल्या कर्जासाठी व्याज अनुदान देण्यात आले होते.

केंद्र सरकारच्या २०१५ मधील योजनेत राज्य शासनाने सहभाग गेतला होता. यामध्ये केंद्र सरकारने एक वर्षाचे तर राज्य शासनाने त्यापुढील चार वर्षांकरिता द.सा.स.शे १० टक्के किंवा बँकेच्या प्रत्यक्ष व्याजदरापेक्षा जो कमी असेल त्यानुसार व्याज अनुदान दिले होते. या योजनेच्या धर्तीवर ही सॉफ्ट लोन योजना मंजूर करण्यात आली आहे. या योजनेसाठी पुढील सात वर्षांसाठी येणाऱ्या सुमारे ७३८ कोटी ५१ लाख रुपयांच्या व्याज अनुदानासही मंजुरी देण्यात आली.

या योजनेंतर्गत बँकांनी दि. ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत मंजुरी व वितरित केलेली रक्कम व्याज अनुदानास पात्र राहील. योजनेत मंजुरी झालेल्या कर्जाचा विनियोग प्रामुख्याने थकीत एफआरपीची रक्कम आदा करण्यास बंधनकारक असेल. थकीत रक्कम नसणा-या कारखान्यांना योजनेतील कर्जाचा वापर २०२६-२७ मधील पूर्वहंगामी कर्जासाठी करता येईल. कर्ज परतफेडीचा कालावधी एक ऑक्टोबर २०२६ पासून पुढील सात वर्षांसाठी असेल; आणि याच कालावधीसाठी व्याज अनुदान देय राहील. द.सा.द.शे. १० टक्के किंवा बँकेकडून आकारण्यात येणारा व्याजदर यापैकी जो दर कमी असेल त्यानुसार व्याज अनुदान देण्यात येईल.

त्याचबरोबर कर्जाचा हफ्ता वेळेत न भरणाऱ्या साखर कारखान्यांना या योजनेतून तत्काळ वगळण्यात येईल आणि अशा कारखान्यांना पुढील कालावधीसाठी व्याज सवलत मिळणार नाही. यासाठी साखर कारखान्यांना जुलै २०२७ पर्यंत कर्जाबातचा विनियोग दाखला सादर करावा लागणार आहे. असा दाखला सादर करू न शकल्यास व्याज अनुदान मिळण्यास कारखाना अपात्र ठरेल.




# शेवगावात अनुदानित वाचनालये कागदावरच?

## ५४ वाचनालयांना वर्षाला ६५ लाखांहून अधिक अनुदान । केवळ ८ ते १० वाचनालये नियमित सुरू

**शेवगाव । वीरभूमी–**

नागरिक व विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन वाचनसंस्कृती रुजावी, यासाठी शासनाकडून सार्वजनिक वाचनालयांना अनुदान दिले जाते. शेवगाव तालुक्यात अ, ब, क व ड वर्गवारीतील तब्बल ५४ सार्वजनिक वाचनालये असून कर्मचारी वेतन, पुस्तक खरेदी व इतर खर्चासाठी शासनाकडून वर्षाला सुमारे ६५ लाख ८ हजार ८०० रुपये अनुदान दिले जाते. मात्र, यापैकी केवळ आठ ते दहा वाचनालये नियमित सुरू असून अनेक वाचनालये कागदोपत्रीच सुरू असल्याचा गंभीर आरोप वाचकांकडून करण्यात येत आहे.

तालुक्यातील सुमारे १० वाचनालयांमध्ये नियमितपणे वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके तसेच शासनाच्या नियमानुसार पुस्तके उपलब्ध असून वाचकांची संख्याही समाधानकारक आहे. मात्र, उर्वरित ४४ वाचनालयांची अवस्था बिकट असल्याचे सांगण्यात येते. काही वाचनालयांना स्वतंत्र इमारती नाहीत, तर काही ठिकाणी पुस्तके व आवश्यक साहित्य उपलब्ध नसल्याचे चित्र आहे. काही वाचनालये चक्क घरांमध्ये सुरू असल्याचेही निदर्शनास येते.

वाचनालयातील ग्रंथपाल व इतर कर्मचाऱ्यांचे वेतन संस्थेच्या बँक खात्यामार्फत अदा करण्याची प्रक्रिया आहे. मात्र, काही संस्थांमध्ये अध्यक्ष, सदस्य, ग्रंथपाल व इतर कर्मचारी एकाच कुटुंबातील असल्याचे आरोप होत आहेत. काही ठिकाणी कर्मचाऱ्यांचे वेतन बँक व्यवहारातून न करता वेगळ्या पद्धतीने दिले जात असल्याचेही सांगितले जाते. त्यामुळे वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी शासनाकडून



दिल्या जाणाऱ्या अनुदानाचा अपेक्षित उपयोग होतो का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पूर्वी सार्वजनिक वाचनालयांची वर्षातून एकदा तपासणी केली जात होती. मात्र, ही तपासणी तालुक्याच्या ठिकाणी केवळ १० ते १५ मिनिटांत उरकली जात असल्याचा आरोप आहे. तपासणीच्या वेळी वाचनालयाचे अध्यक्ष दप्तर घेऊन उपस्थित राहतात; मात्र ग्रंथपाल किंवा इतर कर्मचारी उपस्थित असतातच असे नाही.

त्यामुळे वाचनालय प्रत्यक्षात सुरू आहे का, ग्रंथपाल कार्यरत आहे का, वाचक येतात का, तसेच पुस्तके, वर्तमानपत्रे व अन्य साहित्य उपलब्ध आहे का, याची प्रत्यक्ष पडताळणी कितपत होते, असा प्रश्न वाचकांकडून उपस्थित केला जात आहे.

विशेष म्हणजे, गेल्या दोन वर्षांपासून तालुक्यातील सार्वजनिक वाचनालयांची तपासणी झालेली नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे बंद अथवा अनियमित वाचनालयांना शासनाचे अनुदान सुरू आहे का आणि त्याचा प्रत्यक्ष लाभ वाचकांना मिळतो आहे का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

वाचनालये प्रत्यक्षात सुरू नसतील, तर अशा संस्थांवर कारवाई करावी, बंद वाचनालयांची मान्यता रद्द करावी आणि नियमबाह्य पद्धतीने अनुदान घेतले असल्यास संबंधितांकडून ते व्याजासह वसूल करावे, अशी मागणी वाचक वर्गातून होत आहे. वाचनालयांची प्रत्यक्ष पाहणी करून कर्मचारी, पुस्तके, वर्तमानपत्रे आणि वाचकांची उपलब्धता यांची पारदर्शक पडताळणी करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

> सार्वजनिक वाचनालयांची वार्षिक तपासणी करण्याचे अधिकार आम्हाला राहिलेले नाहीत. त्यामुळे दोन वर्षांपासून कोणतीही तपासणी झालेली नाही. सार्वजनिक वाचनालयांची तीन वर्षांनंतर तपासणी करण्याचे वरिष्ठांचे आदेश आहेत. वाचनालयांसंदर्भात काही तक्रारी असल्यास ग्रंथालय संचालनालय, मुंबई यांच्याशी संपर्क साधावा.
>
> – **संजय मस्के,** जिल्हा ग्रंथालय अधिकारी, अहिल्यानगर

### तपासणीवेळी नागरिकांनाही उपस्थित ठेवण्याची मागणी

▪ बंद अथवा अनियमित वाचनालयांची तपासणी करताना विश्वस्त मंडळ, कर्मचारी, मान्यता पत्र तसेच नागरिक व वाचकांना उपस्थित ठेवावे. त्यामुळे कागदोपत्री सुरू असलेल्या वाचनालयांची वस्तुस्थिती स्पष्ट होईल. शासनाने अशा वाचनालयांची कडक तपासणी करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी वाचकांकडून होत आहे.

# SPOT NEWS

## 'चिंच खांडी'चा घाट रस्ता मृत्यूचा सापळा! संरक्षक कठडे उभारण्याची मागणी

**● अकोले । वीरभूमी –**

अकोले तालुक्यातील धामणगाव आवारी ते धामणगाव पाट दरम्यान असणाऱ्या अत्यंत धोकादायक 'चिंच खांडी'च्या घाटरस्त्याची सध्या कमालीची दुर्दशा झाली आहे. या रस्त्यावरील तीव्र वळणांवर अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला असून, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी येथे तातडीने सिमेंटचे संरक्षक कठडे बसवावेत, अशी तीव्र मागणी नागरिक व प्रवाशांमधून केली जात आहे.अकोले-जुन्नर जोडणारा महत्त्वाचा 'शॉर्टकट':हा घाट रस्ता अकोले आणि जुन्नर तालुक्याला जोडणारा सर्वात कमी वेळेचा मार्ग म्हणून ओळखला जातो. नोकरदार, व्यापारी, उद्योजक तसेच चारचाकी व दुचाकी वाहनधारकांसाठी हा अत्यंत सोयीचा शॉर्टकट रस्ता आहे. विशेषतः अकोले तालुक्यातील बागायतदार शेतकरी ओतूर, आळेफाटा, उदापूर, बनकर फाटा आणि नारायणगाव या भागांतून बटाट्याचे बेणे, भाजीपाला आणि फुलांची रोपे आणण्यासाठी याच मार्गाचा प्रामुख्याने वापर करतात. त्यामुळे या रस्त्यावर नेहमीच मोठी वाहतूक असते.मोठमोठे खड्डे आणि बिकट अवस्था:सध्या या संपूर्ण रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. यामुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. हे खड्डे तातडीने बुजवून रस्त्याचे दर्जेदार खडीकरण व डांबरीकरण करावे, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.रस्ता दोन पदरी करण्याची मागणी; लोकप्रतिनिधींनी लक्ष घालण्याचे आवाहन:वाढत्या वाहतुकीचा ताण पाहता या घाटरस्त्याचे रुंदीकरण करून तो 'दोन पदरी' (टू-लेन) करण्यात यावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. या गंभीर समस्येकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी त्वरित लक्ष घालून रस्त्याचा प्रश्न मार्गी लावावा, अशी अपेक्षा परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे. जर वेळीच उपाययोजना केल्या नाहीत, तर या घाटात मोठा अपघात होण्याची भीती वर्तवली जात आहे.

## ऊस गाळप हंगाम पूर्व बैठक तातडीने घ्या; अभिजीत पोटे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

सन २०२६-२७ च्या ऊस गाळप हंगामाच्या पार्श्वभूमीवर मागील हंगामातील त्रुटी, ऊस दरातील अनियमितता आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली ऊस गाळप हंगाम पूर्व बैठक तातडीने घेण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेचे शिवसैनिक तथा ऊस उत्पादक शेतकरी प्रतिनिधी अभिजीत अशोकराव पोटे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले यावेळी संजय वाघ आदी उपस्थित होते. तसेच त्यावर जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी पुढील आठवड्यात बैठक घेण्याचे आश्वासन दिले. सन २०२३ च्या ऊस गाळप हंगामात श्रीगोंदा येथील कुंडलिकराव जगताप सहकारी साखर कारखान्याने जास्तीचा ऊस दर सांगून शेतकऱ्यांचा ऊस तोडून नेला. त्यानंतर जप्तीची कारवाई निघाल्यावर केवळ एफआरपीप्रमाणे पैसे देण्यात आल्याने शेतकऱ्यांना प्रतिटन ७११ रुपयांचा तोटा सहन करावा लागल्याचा आरोप अभिजीत पोटे यांनी केला आहे. या प्रकरणी संबंधित कारखान्याचे चेअरमन व कार्यकारी संचालक यांना हंगाम पूर्व बैठकीस बोलावून योग्य ती चर्चा करून निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. सन २०२५-२६ च्या ऊस गाळप हंगामात काही साखर कारखान्यांनी साखर उतारा कमी दाखवून ऊस दर कमी दिल्याचा आरोपही पोटे यांनी केला. तसेच नियमांचे उल्लंघन करून जास्तीचा वाहतूक खर्च दाखविणे, साखर उताऱ्यातील तांत्रिक त्रुटी आणि त्यातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान या विषयांवर बैठकीत सविस्तर चर्चा होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यंदा पर्जन्यमान कमी झाल्याने ऊस पिकाची अपेक्षित वाढ झालेली नाही. थंडीच्या काळात उसाची वाढ होऊन साखर तयार होण्याची प्रक्रिया वेग घेते, तसेच उसाचे वजनही वाढते. त्यामुळे ऑक्टोबरमध्ये गाळप हंगाम सुरू केल्यास साखर उतारा कमी होऊन शेतकऱ्यांना कमी ऊस दर मिळण्याची शक्यता आहे. परिणामी, सन २०२६-२७ चा ऊस गाळप हंगाम नोव्हेंबरअखेर किंवा डिसेंबरमध्ये सुरू करण्यात यावा, अशी मागणी अभिजीत पोटे यांनी केली. देशात साखरेचे भाव वाढल्याच्या पार्श्वभूमीवर सरकारने ऊस गाळप हंगाम लवकर सुरू करण्याबाबत निर्णय घेतले आहेत. मात्र, त्याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसू नये यासाठी हंगाम सुरू होण्यापूर्वीच ऊस उत्पादक शेतकऱ्यांना किमान प्रतिटन १ हजार रुपये अनुदान जाहीर करावे, अशी मागणीही त्यांनी केली. जिल्ह्यातील सर्व खाजगी व सहकारी साखर कारखान्यांचे प्रतिनिधी, शेतकरी प्रतिनिधी आणि प्रादेशिक साखर कार्यालयातील संबंधित अधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन ठोस उपाययोजना निश्चित कराव्यात. या बैठकीतील धोरणात्मक निर्णयांची माहिती साखर आयुक्त आणि महाराष्ट्र शासनाला पाठविण्यात यावी, यासाठी बैठक अत्यावश्यक असल्याचे पोटे यांनी स्पष्ट केले.

# शेतकऱ्यांची पिळवणूक करणाऱ्या सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?

### रविराज साबळे : शेतकरी विजय शेळके यांना मारहाण प्रकरणी श्रीगोंद्यात सर्वपक्षीय भव्य निषेध मोर्चा

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

बोगस गोरक्षक, गुटखा - मटका माफिया, भुमाफिया यांना राजाश्रय देणारे शेतकऱ्यांची पिळवणूक करून छळ करणारे, खोटे गुन्हे दाखल करून दाखल करून कायद्याच्या कचाट्यात अडकवणारे सध्याच्या सरकारचे डोके ठिकाणावर आहे का? अशी घणाघाती टीका शेतकरी नेते रविराज साबळे यांनी केली आहे. या गोरक्षकांच्या आडुन माया गोळा करणाऱ्या तथाकथित आकाचा बंदोबस्त करणे काळाची गरज निर्माण झाली आहे असे प्रतिपादन शेतकरी नेते रविराज साबळे यांनी शेतकरी विजय शेळके यांना कथितरीत्या मारहाण करून मानवी मूत्र पाजल्याच्या गंभीर आरोपांप्रकरणी तसेच संबंधित व्यक्तींवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी श्रीगोंदा तहसील कार्यालयावर मंगळवार दि.१५ रोजी भव्य निषेध मोर्चा व जाहीर सभा आयोजित करण्यात आला होता त्यावेळी केले.

या प्रकरणात प्रतीक गोपाळ पाचपुते याच्यासह कथित बोगस गोरक्षक, खंडणीखोर व गुटखा माफियांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी माजी आमदार राहुल जगताप यांनी केली. यावेळी घनश्याम शेलार, सभापती अतुल लोखंडे, अनिल घनवट, सागर सदाभाऊ खोत, रविराज साबळे, भानुदास शिंदे, ॲड. सुशीलकुमार शिंदे, नंदकुमार ताडे, राजेंद्र म्हस्के, दत्ता ढगे आप्पासाहेब अनारसे,



राजेंद्र नागवडे, संतोष खेतमाळीस भाषणे झाली ही संपूर्ण घटना समाजासमोर निर्भीड पद्धतींनी ॲड समित बोरुडे, व अरविंद कापसे, यांनी जनतेसमोर प्रकरण आणले तसेच मोर्चाच्या प्रस्तविकेत अरविंद कापसे केले संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर मोक्का व हद्दपारीची कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

मोर्चाच्या प्रमुख मागण्यांमध्ये प्रतीक पाचपुते याच्यावर मोक्का/हद्दपारीची कारवाई करणे, गुटखा तस्करीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांची तपासणी करून ती जप्त करणे, पोलिसांच्या गुन्ह्यात ताब्यात घेण्यात आलेल्या सुमारे ४००० जनावरांच्या रेकॉर्डची चौकशी करणे तसेच श्रीगोंदा तालुक्यात कथितपणे सुरू असलेल्या बोगस आधार सेंटरची चौकशी करणे.

यावेळी मार्केट कमिटी संचालक. प्रशांत ओगले, अजित जामदार नगरसेवक अख्तर शेख, पांडुरंग पोटे, सोनू कोथिंबीरे, बंटी बोरुडे, अनिल औटी, डॉ. कोकाटे गायकवाड, मुकुंद सोनटक्के, स्मितल वाबळे, सतीश बोरुडे नाना शिंदे, यांच्यासह आष्टी बीड पाटोदा करमाळा हडपसर येथील पीडित शेतकरी व व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आंदोलनात सर्वपक्षीय मागणी केली की, गुन्हा र नं ७१९/२६ या गुन्ह्यातील आरोपी व पंच प्रतीक पाचपुते याचे बँक डिटेल्स कॉल डिटेल्स तपासून प्रतीक पाचपुते यास आरोपी करावे व स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे फिर्यादी पोलीस रोहित मिसाळ जिल्ह्याचा गुटख्याचा आका रवींद्र कर्डिले याला निलंबित करण्याची मागणी केली आहे.

### पशुधन पालक व व्यापाऱ्यांना संरक्षण देणार : अतुल लोखंडे

■ यावेळी आंदोलनात श्रीगोंदा बाजार समितीचे सभापती अतुल लोखंडे यांनी आश्वासन दिले की काष्टी येथील गुरांच्या बाजारात येणाऱ्या प्रत्येक शेतकरी व व्यापाऱ्यांना कुणी अडवणूक केली त्यांना मारहाण करून खंडणी उकळणाऱ्या बोगस, बनावट हिंदु गोरक्षक यांचा बंदोबस्त करून शेतकरी व व्यापारी यांना कायदेशीर व आर्थिक मदत देण्याची घोषणा बाजार समितीचे सभापती अतुल लोखंडे यांनी केली.

## ढोल-लेझीमच्या तालात शिवशंकर मंडळाचा गणपती आगमन सोहळा उत्साहात

**● वडनेर । वीरभूमी–**

श्री गणरायाचा जयघोष, ढोलाचा निनाद, लेझीमचा ताल, सनईचे मंगल सूर आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात वडनेर बुद्रुक नगरीत गणरायाचे उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात आगमन झाले.

शिवशंकर गणेश मित्र मंडळाच्या वतीने यंदाचा गणपती आगमन सोहळा पारंपरिक पद्धतीने आणि सांस्कृतिक वारसा जपत साजरा करण्यात आला. आधुनिकतेच्या युगातही गावची संस्कृती, परंपरा आणि लोककला जपण्याचा संदेश या सोहळ्यातून देण्यात आला.

गणरायाच्या आगमनावेळी ढोल, लेझीम, सनई आणि पारंपरिक वाद्यांच्या गजराने संपूर्ण गाव दुमदुमून गेले. नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद, उत्साह आणि भक्तिभाव दिसून येत होता. पारंपरिक वाद्यांच्या तालामुळे वातावरण अधिकच भारावून गेले.

सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले ते लहान मुलींपासून वयोवृद्ध महिलांपर्यंत सर्वांनी परिधान केलेले पारंपरिक पोशाख. नऊवारी साडी,



पारंपरिक दागिने आणि मराठमोळा साज परिधान करून महिलांनी आगमन सोहळ्याची शोभा वाढवली. लहान मुलींच्या उत्साहापासून ज्येष्ठ महिलांच्या उत्स्फूर्त सहभागापर्यंत प्रत्येक क्षण आनंददायी ठरला.

विशेष म्हणजे गावातील लेझीम कलेचा वारसा आजच्या पिढीबरोबरच महिला आणि मुलीही आत्मसात करत आहेत. मातीत रुजलेली ही कला पुढील पिढीकडे पोहोचविण्याचे काम गावकरी करत असल्याचे या सोहळ्यातून दिसून आले. ही बाब गावच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक ठरली.

गणरायाच्या आगमन सोहळ्यात केवळ उत्सव नव्हे, तर एकता, संस्कृती, परंपरा आणि सामूहिक अभिमानाचे दर्शन घडले. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी एकत्र येत उत्साहाने सहभाग घेतल्याने संपूर्ण वडनेर बुद्रुक गाव भक्ती आणि आनंदाने न्हाऊन निघाले. 'परंपरा जपली तर संस्कृती टिकते आणि संस्कृती टिकली तर गावाची ओळख टिकते,' याचा प्रत्यय या आगमन सोहळ्यात आला. शिवशंकर गणेश मित्र मंडळाने आगमन सोहळ्याच्या माध्यमातून गावच्या परंपरा आणि लोककलेचा केलेला जागर कौतुकास्पद असून, पुढील पिढीसाठी तो निश्चितच प्रेरणादायी ठरला.

## अगस्ती विद्यालयाच्या पाच विद्यार्थिनींची तालुकास्तरीय तायक्कांदो स्पर्धेत दमदार कामगिरी

**● अकोले । वीरभूमी –**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर व तालुका क्रीडा समिती, अकोले यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या भव्य तायक्कांदो तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा २०२६-२७ मध्ये अगस्ती विद्यालय, अकोलेच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली आहे.

या स्पर्धेत १७ वर्षे वयोगटातील अगस्ती विद्यालयाच्या पाच विद्यार्थिनींनी आपल्या गटात दमदार कामगिरी करत विजय मिळविला असून त्यांची जिल्हास्तरीय स्पर्धे साठी निवड झाली आहे.

विजयी विद्यार्थिनी पुढीलप्रमाणे : शिंदे प्रांजल सचिन (४४ ते ४६ किलो वजनगट), चौधरी वैष्णवी विष्णू (४२ ते ४४ किलो वजनगट), संस्कृती फक्कड चौधरी (३८ ते ४२ किलो वजनगट),



अरगडे सुप्रिया सचिन (३५ ते ३८ किलो वजनगट), शिंदे अर्णवी दीपक (३२ ते ३५ किलो वजनगट) या पाचही विद्यार्थिनींनी तायक्कांदो या क्रीडा प्रकारातील कौशल्य, शिस्त, आत्मविश्वास आणि जिद्दीचे दर्शन घडवत आपल्या वजनगटात उत्कृष्ट कामगिरी केली. त्यांच्या या यशामुळे अगस्ती विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या यशासाठी विद्यार्थिनींना मार्गदर्शक शिक्षक ओम बाणाईत सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थिनींच्या नियमित सरावातून, मेहनतीतून आणि योग्य मार्गदर्शनातून हे यश संपादन झाले आहे.

पाचही विद्यार्थिनींची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल विद्यालयातील मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले असून, आगामी जिल्हास्तरीय स्पर्धे साठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. विद्यार्थ्यांचे संस्थेच्या सेक्रेटरी शैलजा पोखरकर, कार्यवाहक शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी, मुख्याध्यापक संजय शिंदे, उपमुख्याध्यापक संदीप दरोळे, पर्यवेक्षक विजय नाईकवाडी, शालेय व्यवस्थापनचे उपाध्यक्ष दत्ता नवले, प्रकाश साळवे, दौलत कानवडे आदींनी अभिनंदन केले.

# पारनेरच्या पाणी योजनेसाठी विजय औटी यांचा उपोषणाचा इशारा

**● पारनेर । वीरभूमी –**

पारनेर नगरपंचायत हद्दीतील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना करावी, या मागणीसाठी विजय सदाशिव औटी यांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता पारनेर येथील क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या लाल चौकातील पुतळ्यासमोर हे आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे त्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांना दिलेल्या निवेदनातून स्पष्ट केले आहे.

पारनेर नगरपंचायत हद्दीतील नागरिकांना गेल्या अनेक दिवसांपासून नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पिण्याचे पाणी हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित अत्यंत महत्त्वाचा आणि मूलभूत प्रश्न असताना या समस्येवर अद्याप कायमस्वरूपी तोडगा निघालेला नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

पारनेरच्या पाणीप्रश्नाबाबत शासन व प्रशासन स्तरावर आवश्यक कार्यवाही झाल्याचे सांगितले जात असले, तरी पाणीपुरवठा योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप प्रतीक्षेत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. मंजुरीच्या प्रक्रियेत असलेल्या अथवा मंजुरीच्या प्रतीक्षेत असलेल्या पाणीपुरवठा योजनेला तातडीने मूर्त स्वरूप देऊन संबंधित विभागांना स्पष्ट आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

पारनेरकरांना कायमस्वरूपी आणि सुरळीत पाणीपुरवठा मिळणे हा नागरिकांचा रास्त व न्याय्य हक्क आहे. प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन पाणीप्रश्न सोडवावा, अशी भूमिका औटी यांनी मांडली आहे.

प्रशासनाने सकारात्मक कार्यवाही करून नागरिकांचा प्रश्न लोकशाही मार्गाने सोडवावा आणि पाणीपुरवठ्यासाठी निश्चित



कालबद्ध कृती आराखडा जाहीर करावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. प्रशासनाने वेळेत कार्यवाही केल्यास आमरण उपोषणाची वेळ येणार नाही, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या निवेदनाच्या प्रती विविध शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच ज्येष्ठ समाजसेवकांना देण्यात आल्या आहेत. आता प्रशासन या गंभीर पाणीप्रश्नावर कोणती भूमिका घेते, याकडे पारनेरकरांचे लक्ष लागले आहे.

## टीव्हीएस iQube मिलियनआर स्पेशल एडिशनने पुण्यात

# एकत्रितपणे १०० हून अधिक वाहने वितरीत करून ग्राहकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाची नोंद

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

टीव्हीएस वेणूचा एक भाग आणि दुचाकी आणि तीन चाकी वाहनांच्या निर्मितीमध्ये जागतिक स्तरावर आघाडीवर असलेल्या टीव्हीएस मोटरने TVS iQube च्या ग्राहकांच्या वाढत्या संख्येचा आनंद साजरा केला. यासाठी आज पुण्यात एक मेगा डिलिव्हरी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. एका दिवसात TVS iQube MillionR स्पेशल एडिशन इलेक्ट्रिक स्कूटर्स १०० हून अधिक ग्राहकांना वितरीत करण्यात आल्या, २५ ऑगस्ट रोजी लॉन्च केल्यानंतर अल्पावधीतच या नवीन लाँच झालेल्या एडिशनला मिळालेला हा जोरदार प्रतिसाद आहे. १० लाखांहून अधिक TVS iQube स्कूटर्स रस्त्यावर धावत असल्याचा महत्त्वाचा टप्पा गाठल्याच्या आनंदात MillionR स्पेशल एडिशन सादर करण्यात आली आहे.

TVS iQube द्वारे इलेक्ट्रिक मोबिलिटीचा स्वीकार करणाऱ्या दहा लाखांहून अधिक ग्राहकांच्या विश्वासातून प्रेरणा घेऊन, MillionR Edition हा एक महत्त्वपूर्ण टप्पा साजरा करत आहे आणि त्याच वेळी भारताची पसंतीची फॅमिली ईव्ही (EV) म्हणून या स्कूटरचे स्थान अधिक मजबूत करते आहे. टीव्हीएस मोटरच्या ईव्ही पोर्टफोलिओमधील प्रमुख इलेक्ट्रिक स्कूटर म्हणून, TVS iQube ने इलेक्ट्रिक दुचाकींच्या श्रेणीत कंपनीचे नेतृत्व बळकट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे; तसेच, या वर्षी बाजार हिश्शानुसार टीव्हीएस मोटरला पहिल्या क्रमांकाचे स्थान मिळवून देण्यातही तिचे योगदान आहे.

MillionR Edition ही स्कूटर डिझाइन, तंत्रज्ञान आणि दैनंदिन सोयींचा सुरेख संगम साधत, दहा लाख ढतड ळर्टीलश च्या टप्प्यावर एक वैशिष्ट्यपूर्ण नवीन रूप सादर करते. ३.५ kWh व्हेरिएंटवर आधारित असलेल्या या आवृत्तीमध्ये नॉर्दर्न लाइट्स पासून प्रेरित असा नवीन ऑरोरा ग्रीन ड्युअल टोन रंग, प्रीमियम सीट अपहोल्स्ट्री, खास MillionR बॅजिंग आणि वैशिष्ट्यपूर्ण ग्राफिक्स यांचा समावेश आहे. हे सर्व घटक MillionR Edition ला एक वेगळी ओळख देतात आणि त्याच वेळी, टीव्हीएस iQube ला



आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवणाऱ्या त्या दहा लाख ग्राहकांच्या विविध प्रवासांचे तसेच अनुभवांचे सेलिब्रेशन करतात.

टीव्हीएस आयक्यूब मिलियनआर स्पेशल एडिशन दैनंदिन वापरासाठी अधिक सोयीची आहे. यात समोरच्या बाजूला एक युटिलिटी स्टोरेज कंपार्टमेंट आहे, ज्यामुळे स्कूटरची एकूण साठवण क्षमता ३२ लिटरवरून ३५.५ लिटरपर्यंत वाढते. सोबतच यात एक इंटिग्रेटेड यूएसबी टाइप-सी चार्जिंग पोर्ट देखील आहे. स्कूटरमध्ये ३.५ kWh क्षमतेची बॅटरी कायम ठेवण्यात आली आहे, ती १४५ किमीची




आयडीसी रेंज देते आणि ११८ पेक्षा जास्त कनेक्टेड टेक्नॉलॉजी फीचर्सने सुसज्ज आहे.


पुण्यातील मेगा डिलिव्हरी इव्हेंटने हा महत्त्वाचा टप्पा प्रत्यक्षात आणला, जिथे ग्राहक आणि त्यांचे कुटुंबीय इलेक्ट्रिक मोबिलिटीकडे झालेल्या त्यांच्या संक्रमणाचा आनंद साजरा करण्यासाठी एकत्र आले. या इव्हेंटमध्ये इंटरॅक्टिव्ह अनुभव, आकर्षक उपक्रम, ग्राहकांना बक्षिसे जिंकण्याची संधी आणि ग्राहक डिलिव्हरीचा एक आनंदी अनुभव यांचा समावेश होता.

टीव्हीएस आयक्यूब मिलियनआर स्पेशल एडिशनची किंमत १,४०,७१० (प्रभावी एक्स-शोरूम, महाराष्ट्र) इतकी आहे. टीव्हीएस iQube ची श्रेणी १,१३,०८७ (प्रभावी एक्स-शोरूम, महाराष्ट्र) पासून सुरू होते, तर इररड (बॅटरी ज अ सर्व्हिस) अंतर्गत किंमती ५९,९९९ पासून सुरू होतात.

# SPOT NEWS

## निमगाव वाघात पर्यावरणपुरक श्री गणेशाची स्थापना

**अहिल्यानगर I वीरभूमी–**



निमगाव वाघा (ता. नगर) येथे पर्यावरणपुरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने स्व.पै.किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने शाडूच्या मातीच्या गणेश मुर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. डोंगरे वस्ती येथे ग्रामपंचायत सदस्य तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. यावेळी सचिव मंदाताई डोंगरे, युवा मंडळाचे अध्यक्ष पै.संदिप डोंगरे, अजिंक्य वाबळे, कृष्णा डोंगरे, कार्तिक डोंगरे, शिवा डोंगरे, दादा डोंगरे, किरण ठाणगे आदी उपस्थित होते. गणेश उत्सवानिमित्त निमगाव वाघात संस्थेच्या वतीने विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. व्यसनमुक्ती व पर्यावरणाच्या जागृतीसाठी उपक्रम राबविण्यात येणार आहे. तर जनजागृतीसाठी पथनाट्याचे आयोजन करुन मतदार जागृती, स्त्री जन्माचे स्वागत, स्त्री सक्षमीकरण, व्यसनमुक्तीचा संदेश दिला जाणार आहे. युवकांसाठी स्वच्छता अभियान व वृक्षरोपण अभियान देखील राबविण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी दिली.

## जन शिक्षण संस्थेत क्षमता बांधणी कार्यक्रम उत्साहात

**अहिल्यानगर I वीरभूमी –**

महिला व युवतींना विविध व्यावसायिक कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने भारत सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय (नवी दिल्ली) संचलित जन शिक्षण संस्थेच्या वतीने क्षमता बांधणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील जन शिक्षण संस्थेत झालेल्या या कार्यक्रमात महिला प्रशिक्षिका व शिक्षिकांना विविध व्यावसायिक प्रशिक्षणाबरोबरच मार्केटिंग, बाजारपेठेची उपलब्धता, उद्योग-व्यवसायासाठी आवश्यक असलेले बीज भांडवल, शासकीय योजना, कर्ज प्रक्रिया आणि उद्योजकता विकास याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्रशिक्षणार्थी युवती व महिला देखील मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी जन शिक्षण संस्थेचे नूतन संचालक अनिल तांदळे, कार्यक्रम अधिकारी सय्यद शफाकत, मनीषा शिंपी, अनुष्का वारे, नीलिमा बल्लाळ, अमर अग्रवाल आदी उपस्थित होते. प्रास्ताविक करताना कार्यक्रम अधिकारी सय्यद शफाकत यांनी जन शिक्षण संस्थेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी सुरू असलेल्या विविध उपक्रम व प्रकल्पांची माहिती दिली. जन शिक्षण संस्थेचे नूतन संचालक अनिल तांदळे यांनी महिला आज विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत असल्याचे सांगितले. चिकाटी, जिद्द आणि कौशल्याच्या जोरावर महिला उद्योग व व्यवसाय क्षेत्रात स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण करीत आहेत. महिलांसाठी नोकरीपेक्षा उद्योग-व्यवसायाच्या माध्यमातून मोठ्या संधी निर्माण झाल्या असून, या संधींचा लाभ घेण्यासाठी महिलांनी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. युवक-युवतींमध्ये कौशल्याधारित शिक्षणाची रुजवणूक झाली तर सक्षम आणि आत्मनिर्भर भारताची निर्मिती होण्यास मोठी मदत होईल. केवळ पारंपरिक शिक्षणावर अवलंबून न राहता बाजारपेठेची गरज ओळखून कौशल्य आत्मसात करणे आणि त्या कौशल्याचे व्यवसायात रूपांतर करणे ही आजच्या काळाची गरज असल्याचे तांदळे यांनी स्पष्ट केले. जन शिक्षण संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत ४० हजारांपेक्षा अधिक महिला व युवतींना विविध व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम करण्यात आले आहे. या संपूर्ण प्रक्रियेत महिला प्रशिक्षिकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण राहिली आहे. महिलांना कौशल्य शिकविण्याबरोबरच त्यांना आत्मविश्वास देणे, व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देणे आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी मार्गदर्शन करणे, असे बहुआयामी कार्य प्रशिक्षिका करीत आहेत. त्यांच्या या योगदानाचा सन्मान म्हणून क्षमता बांधणी कार्यक्रमात त्यांचा सन्मान करण्यात आल्याचे तांदळे यांनी सांगितले. कार्यक्रमात अमर अग्रवाल यांनी महिला बचत गट, विविध शासकीय योजना, कर्ज प्रक्रिया आणि उद्योजकता विकास या विषयांवर उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. महिलांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करताना कोणत्या बाबींचा विचार करावा, व्यवसायाची निवड कशी करावी, बाजारपेठेची गरज कशी ओळखावी, उपलब्ध साधनसामग्री व भांडवलाचा योग्य वापर कसा करावा, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जन शिक्षण संस्थेच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# बैलगाडी, पोतराजासह शेतकऱ्यांचा आक्रोश मोर्चा

**आठ दिवसांत दुष्काळ जाहीर न झाल्यास रस्ता रोको I संभाजी ब्रिगेडच्या वतीने तहसीलदारांना मागण्यांचे निवेदन**

**श्रीगोंदा I वीरभूमी –**

मांडवगण जिल्हा परिषद गटासह संपूर्ण श्रीगोंदा तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करावा, शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, तसेच पिण्याचे पाणी व जनावरांसाठी चाऱ्याची व्यवस्था करावी, या मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने सोमवार दि. १५रोजी शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. पंचायत समितीपासून तहसील कार्यालयापर्यंत काढलेल्या या मोर्चानंतर तहसीलदारांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

मोर्चात बैलगाडी आणि पोतराजाच्या पारंपरिक सादरीकरणातून शेतकऱ्यांच्या दुष्काळग्रस्त परिस्थितीकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले. मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या शेतकऱ्यांनी घोषणाबाजी करत आपल्या मागण्यांसाठी आवाज उठविला. तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.




मांडवगण गटासह संपूर्ण श्रीगोंदा तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करावा, माणसे व जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची तातडीने व्यवस्था करावी, चारा छावण्या सुरू कराव्यात आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. पीक कर्जवसुलीला स्थगिती देऊन विद्यार्थ्यांना शैक्षणिक शु ल्कात सवलत द्यावी, अशीही मागणी करण्यात आली.

जलसंधारणाची कामे, तलाव दुरुस्ती व खोलीकरणासाठी विशेष निधी द्यावा, पाणीगळती रोखण्यासाठी उपाययोजना कराव्यात, दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे व नुकसानभरपाई द्यावी, तसेच शेतीसाठी नियमित वीजपुरवठा करावा, या मागण्यांचाही निवेदनात समावेश आहे.

प्रशासनाने आठ दिवसांच्या आत कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. अन्यथा नगर-सोलापूर महामार्गावरील मांडवगण येथे शेतकरी रस्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल. या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी शासन व प्रशासनाची राहील, असा इशारा संभाजी ब्रिगेडचे अहिल्यानगर जिल्हा संपर्कप्रमुख इंजि. शामभाऊ जरे यांनी दिला.

या मोर्चात संभाजी ब्रिगेड शेतकरी आघाडीचे जिल्हाध्यक्ष दिलीप आबा वाळुंज, शेतकरी आघाडीचे तालुकाध्यक्ष उत्तम मामा घोगरे, तालुकाध्यक्ष दिलीपराव लबडे, तालुका कार्याध्यक्ष बापू उर्फ प्रफुल्ल जगताप, सरपंच राम घोडके, सचिव रवींद्र महांडुळे, संघटक संतोष आरडे, शहराध्यक्ष अक्षय दहातोंडे, सामाजिक कार्यकर्ते नंदू दरेकर, उपाध्यक्ष गणेश महांडुळे, कामगार आघाडीचे तालुकाध्यक्ष घनशाम काळे, तसेच हरिभाऊ महांडुळे, प्रदीप दरेकर, बाळकृष्ण महांडुळे, होरे माऊली, सद्दाम शेख, पांडुरंग खोरे, सतीश श्रीराम, सुभाष ढवळे, जालिंदर हिरडे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले.

## जरांगे पाटील यांच्या श्रीगोंदा मुक्कामाच्या पार्श्वभूमीवर श्रीगोंद्यात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

**४० अधिकारी, ३०० पोलीस कर्मचारी तैनात I तालुक्यात स्वागताची जय्यत तयारी**

**श्रीगोंदा I वीरभूमी –**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईच्या दिशेने कूच सुरू केली असून, त्यांच्या नियोजित प्रवासात श्रीगोंदा येथे उद्या, बुधवार दि. १६ रोजी आगमन होणार असल्याची माहिती आहे. काही निवडक कार्यकर्त्यांसह ते श्रीगोंद्यात दाखल होणार असून, बाजारतळ येथे त्यांचा मुक्काम होणार आहे. या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाने बंदोबस्ताची तयारी केली असून, तालुक्यातील विविध ठिकाणी जरांगे पाटील यांच्या स्वागतासाठी कार्यकर्त्यांकडून जय्यत तयारी सुरू आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने प्रवास सुरू केला आहे. १९ सप्टेंबर रोजी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्याची त्यांची घोषणा आहे. या प्रवासादरम्यान पाटोदा, श्रीगोंदा, हडपसर आणि खोपोली येथे थांबे नियोजित असल्याचे वृत्त आहे. त्यामुळे श्रीगोंदा येथील नियोजित मुक्कामाकडे मराठा समाजासह तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

जरांगे पाटील यांच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे. बंदोबस्तासाठी ४० अधिकारी आणि ३०० पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आल्याची माहिती आहे. बाजार तळ परिसर तसेच त्यांच्या प्रवासाच्या मार्गावर पोलिसांचा बंदोबस्त राहणार असून, गर्दीचे नियोजन आणि वाहतूक सुरळीत ठेवण्याचे आव्हान प्रशासनासमोर आहे.

दरम्यान, जरांगे पाटील यांच्या स्वागतासाठी तालुक्यातील विविध गावांमध्ये कार्यकर्त्यांकडून तयारी सुरू असल्याचे समजते. त्यांच्या स्वागतासाठी ठिकठिकाणी मोठ्या संख्येने नागरिक व कार्यकर्ते उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे त्यांच्या आगमनावेळी गर्दीचे नियोजन, वाहतूक व्यवस्था आणि शांतता राखण्याची जबाबदारी पोलिस प्रशासनावर राहणार आहे.

मुंबई आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जरांगे पाटील यांच्या श्रीगोंदा मुक्कामाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यांच्या आगमनानंतर मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे.

## शेवगावात लोकन्यायालयातून ५० दाव्यांचा निपटारा

**शेवगाव I वीरभूमी–**

लोकन्यायालयात पैशांची तसेच वेळेची बचत होते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे दावे सामंजस्याने मिटत असल्याने परस्परांमध्ये कटुता निर्माण होत नाही. त्यामुळे श्रम, वेळ व पैसा वाचवून आपसातील कटुता टाळायची असेल, तर लोकन्यायालय हा उत्कृष्ट पर्याय आहे, असे मत शेवगावचे दिवाणी न्यायाधीश डी. आर. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.



शेवगाव तालुका वकील संघ व तालुका विधी सेवा समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लोकन्यायालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी आयोजित लोकन्यायालयास म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. दाखलपूर्व ८०० दिवाणी व फौजदारी दाव्यांपैकी ४६ दावे, तर ग्रामपंचायती, वीज महामंडळ व बँकांच्या थकित बिलांबाबतच्या २ हजार ६५७ दाव्यांपैकी ४ दावे, असे एकूण ५० दावे निकाली काढण्यात आले. यातून तब्बल ४० लाख ७३ हजार १२६ रुपयांची वसुली झाली.

वसुलीच्या संदर्भातील लक्षणीय बाब म्हणजे तडजोड करून थकबाकी भरण्यासाठी ग्राहक यावेळी उपस्थित होते; मात्र रक्कम स्वीकारण्यासाठी संबंधित कर्मचारी उपस्थित नव्हते.

या सर्व दाव्यांच्या निपटाऱ्याचे कामकाज शेवगाव न्यायालयाचे पहिले दिवाणी न्यायाधीश डी. आर. कुलकर्णी यांनी पाहिले. विविध बँकांचे तसेच अन्य दावे मिटविण्यासाठी शेवगाव वकील संघाचे अध्यक्ष ॲड. आर. आर. आगळे, ॲड. एम. ए. शेख, ॲड. मनोहर थोरात, ॲड. एस. बी. भोसले, ॲड. संजय सानप, ॲड. ए. एम. जाधव, ॲड. शैलेश भारदे, ॲड. एल. एच. लांडे, ॲड. के. के. गलांडे, सहा. अधीक्षक राजेंद्र गोंधणे, विधी सेवा समितीचे बी. बी. मुरदारे, एच. आर. दिवटे, श्रीमती जी. बी. घनवट तसेच पोलिस कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले.

# निघोज परिसरात ५० हून अधिक गणेश मंडळांकडून बाप्पांची प्रतिष्ठापना

**निघोज I वीरभूमी–**

गणपती बाप्पांच्या आगमनाचे निघोज व परिसरात मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले. टाळ-मृदंग, झांज पथक, ताशा-पिपाणीच्या गजरात 'गणपती बाप्पा मोरया', 'मंगलमूर्ती मोरया', 'उंदीरमामाच्या जय' अशा जयघोषाने परिसर दणाणून गेला.



निघोज व परिसरात ५० हून अधिक गणेश मंडळे कार्यरत असल्याने बाप्पांच्या मूर्ती वाजतगाजत नेण्यासाठी सकाळी ८ वाजल्यापासून रात्री उशिरापर्यंत मिरवणुका सुरू होत्या. निघोज व परिसरातील पुरोहित देशपांडे व धोंगडे यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आली. तसेच मान्यवरांच्या हस्ते महाआरती करून मंडळांनी बाप्पांची प्रतिष्ठापना केली.

मळगंगा साईधाम गणेश मंडळ, मळगंगा साईधाम युवा गणेश मंडळ, संघर्ष युवा गणेश मंडळ, संदीप पाटील गणेश मित्र मंडळ, वीर सावरकर गणेश मंडळ, वाघजाई गणेश मंडळ, मुलिका गणेशोत्सव मंडळ खंडोबा पाऊतके, मुलिका देवी गणेशोत्सव मंडळ साईदत्तनगर, आपला गणपती सामाजिक प्रतिष्ठान गणेश मंडळ, धर्मरक्षक प्रतिष्ठान गणेश मंडळ, जय मल्हार गणेश मंडळ, वरदविनायक गणेश मंडळ तनपुरे वस्ती, लाळगे वस्ती गणेश मंडळ, जय बजरंग गणेश मंडळ लामखडे-वरखडे वस्ती, कानिफनाथ गणेश मंडळ कवाद वस्ती, संत सावता महाराज गणेश मंडळ रसाळवाडी, बाळगोपाळ गणेश मंडळ, कानिफनाथ गणेश मंडळ ढवणवाडी, खंडोबा गणेश मंडळ शिरसुले, भैरवनाथ गणेश मंडळ वडगाव गुंड आदी गणेश मंडळांनी आकर्षक मंडप उभारले आहेत.

विविध मंडळांनी आकर्षक विद्युत रोषणाई, विविध स्पर्धा व सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले आहे. गणेशोत्सवाच्या बारा दिवसांत नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, तसेच हिंदू समाजात जनजागृती करण्याचा निर्धार मंडळांनी व्यक्त केला आहे.

### गणेश मंडळांना पत्रकार संघाकडून पुरस्कार

निघोज जिल्हा परिषद गटातील आदर्श गणेश मंडळांना पुरस्कार व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. तसेच मंडळांचे पदाधिकारी व सदस्य यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्याचा कार्यक्रम ऑक्टोबर महिन्यात राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई, पारनेर तालुका पत्रकार संघ आणि पत्रकार संघ विभागीय कार्यालय, निघोज यांच्या वतीने आयोजित करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी गणेश मंडळांनी पत्रकार संघ विभागीय कार्यालय, निघोजचे मुख्य समन्वयक दत्तात्रय उनवणे यांच्याशी मोबाईल क्रमांक ९०९६२७६६८७ वर संपर्क साधावा, असे आवाहन पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# कोतूळच्या 'वरदविनायक' मंदिरात अथर्वशीर्षाचा निनाद!

**ऋषिपंचमी निमित्त शेकडो भाविकांचे सामूहिक पठण I 'जय भवानी मंडळा'चा १५ वा यशस्वी उपक्रम**

**अकोले I वीरभूमी –**

ऋषिपंचमीचे औचित्य साधून कोतूळ येथील प्राचीन व नवसाला पावणाऱ्या श्री वरदविनायक देवस्थानात मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी पहाटे ठीक ६ वाजता सामुदायिक अथर्वशीर्ष पठण भक्तिमय वातावरणात संपन्न झाले. जय भवानी संस्कृती संवर्धन मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे यंदाचे १५ वे वर्ष होते. शेकडो भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागाने या सोहळ्याची शोभा वाढवली. श्री गणेशाची उपासना ही ऐक्य, बंधुभाव, राष्ट्रीय एकात्मता आणि सामूहिक कार्यक्षमता वाढविणारी आहे, याच भावनेतून या पठणाचे आयोजन करण्यात आले होते.



पहाटेच्या शांत वातावरणात शंखनाद व ओंकाराच्या गजराने कार्यक्रमाची सुरुवात झाली. शेकडो भाविकांच्या मुखातून एकाच वेळी उमटलेला मंत्रघोष आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर गणेशमय झाला होता. 'हरिः ॐ नमस्ते गणपतये...' या मंत्रोच्चाराने उपस्थितांना सामूहिक भक्तीचा एक अनोखा आणि चैतन्यमय अनुभव दिला.

ऋषिपंचमीच्या निमित्ताने उपस्थित महिलांनी ऋषींचे श्रद्धापूर्वक पूजन केले. सौ. विद्या परशुरामी यांनी पोथीवाचन केले. ग्रामीण भागात पहाटेच्या वेळीही महिला व भाविकांनी दर्शवलेला हा उत्स्फूर्त प्रतिसाद या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरला. पठणाचे नेतृत्व: सौ. प्रज्ञा भाटे, विद्या परशुरामी, द्वारका पोखरकर आणि वर्षा नेवासाकर यांनी केले.

पठणानंतर सौ. व श्री. देवानंद पोखरकर यांच्या हस्ते श्री गणेशाची महाआरती झाली. देवस्थानचे अध्यक्ष प्रदीप भाटे यांनी पोखरकर दाम्पत्याचा विशेष सन्मान केला आणि मंदिराच्या वतीने चालणाऱ्या विविध सामाजिक कार्यांची माहिती उपस्थितांना दिली.

या सोहळ्याला डॉ. सुभाष सोमण, डॉ. कपिल कातोरे, सुभाष घाटकर, अनिल पाठक, बाळासाहेब पोखरकर, संभाजी पोखरकर, विशाल बोऱ्हाडे, कुलदीप नेवासकर, विनय समुद्र, अजित आरोटे, अविनाश गिते, सागर सोनुले, निलेश घोडे आणि प्रबोध भाटे यांच्यासह परिसरातील नागरिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.जय भवानी संस्कृती संवर्धन मंडळाच्या वतीने गेल्या १५ वर्षांपासून अखंड सुरू असलेला हा उपक्रम कोतूळच्या समृद्ध धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेची साक्ष देणारा ठरत आहे.

## पांडुरंग कृपा पतसंस्थेचा सभासदांना १० टक्के लाभांश

**निघोज I वीरभूमी–**

श्री पांडुरंग कृपा सहकारी पतसंस्थेच्या सभासदांना यंदा १० टक्के लाभांश देण्याचा निर्णय संस्थेच्या २८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत जाहीर करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत लंके व उपाध्यक्ष दत्तात्रय गुंड यांनी ही माहिती दिली.

वडगाव गुंड येथील सभागृहात संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्ष चंद्रकांत लंके यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. संचालक मंडळ व व्यवस्थापक सुदर्शन गाडेकर यांनी विविध विषयांचे व ठरावांचे वाचन केले. उपस्थित सभासदांनी टाळ्यांच्या गजरात सर्व विषय व ठराव सर्वानुमते मंजूर केले.

सभेच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करून सरस्वती, लक्ष्मी माता व कुलदैवत भैरवनाथ यांच्या प्रतिमांचे पूजन संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक साहेबराव जगदाळे, माजी उपसरपंच बाबाजी लंके, प्रगतिशील शेतकरी शंकरराव रसाळ व आदर्श मुख्याध्यापक बन्सी गुंड यांच्या हस्ते करण्यात आले.

संस्थेच्या आर्थिक प्रगतीची माहिती देताना अध्यक्ष चंद्रकांत लंके व उपाध्यक्ष दत्तात्रय गुंड यांनी सांगितले की, अहवाल वर्षात संस्थेला १७ लाख ९४ हजार रुपये नफा झाला आहे. संस्थेच्या ठेवी १० कोटी २४ लाख रुपये, कर्जवाटप ९ कोटी ३१ लाख ५० हजार रुपये, गुंतवणूक ३ कोटी ५० लाख रुपये, निधी १ कोटी १ लाख रुपये, तर वसूल भागभांडवल ४१ लाख २७ हजार रुपये आहे.

निघोज शाखा सुरू केल्यानंतर निघोज व पंचक्रोशीतील व्यावसायिक, उद्योजक, शेतकरी, ठेवीदार व हितचिंतकांनी दिलेल्या मोठ्या योगदानामुळे संस्थेची आर्थिक भरभराट झाली आहे, असेही त्यांनी सांगितले.

'सहकारी पतसंस्था चळवळीच्या माध्यमातून ग्रामविकास' ही संकल्पना आणि 'सामाजिक सेवाभाव' हे ध्येय ठेवून संस्था विकासाकडे वाटचाल करीत आहे. वडगाव गुंड येथे लावलेले पतसंस्थेचे छोटेसे रोपटे आज निघोज व परिसरातील ग्रामस्थांच्या योगदानातून वटवृक्षाच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे अध्यक्ष व उपाध्यक्षांनी नमूद केले.

यावेळी मार्गदर्शक, सभासद व ग्रामस्थांनी मनोगतात संस्थेच्या प्रगतीचे कौतुक केले.

सभेस उपाध्यक्ष दत्तात्रय गुंड, ज्येष्ठ मार्गदर्शक साहेबराव जगदाळे, उपसरपंच बाबाजी लंके, संचालक भागुजी गुंड, बन्सी गुंड, विजय लंके, विजय गुंड, हिराभाऊ सोनवणे, संचालिका कांताबाई गुंड, हौसाबाई लंके, तज्ज्ञ संचालक सत्यवान गुंड, अंकुश लोखंडे, प्रशांत लंके, रोहिदास लामखडे, अशोक गुंड, सखाराम जगदाळे आदींसह सभासद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थेचे व्यवस्थापक सुदर्शन गाडेकर यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष दत्तात्रय गुंड यांनी आभार मानले.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# ‘वारकरी-शेतकरी’ एकत्र आणण्याची परंपरा घुले पाटलांनी जपली

## उद्धव महाराज मंडलिक । लोकनेते मारुतराव घुले पाटील यांची ९६ वी जयंतीनिमित्त ऊस उत्पादकांचा सन्मान

**● नेवासा । वीरभूमी-**

**लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांनी विविध उपक्रमांच्या माध्यमातून ‘वारकरी व शेतकरी’ यांना एकत्र आणण्याची परंपरा सुरू करून ती जपली, असे प्रतिपादन नेवासा येथील श्रीसद्गुरु नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत गुरुवर्य उद्धव महाराज मंडलिक (नेवासेकर) यांनी केले.**

भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना व उद्योग समूहाचे संस्थापक लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांच्या ९६ व्या जयंतीनिमित्त सोमवार, दि. १५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता श्रीसंत नागेबाबा भक्त निवास येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारखाना व उद्योग समूहाचे अध्यक्ष तथा माजी आमदार नरेंद्र घुले पाटील होते.

यावेळी जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष तथा माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील, कारखान्याचे उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे पाटील, श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, ॲड. देसाई देशमुख, डॉ. क्षितिज घुले, संचालक पंडितराव भोसले, अशोकराव मिसाळ, दत्तात्रय काळे, डॉ. नारायण म्हस्के, जनार्दन कदम, मच्छिंद्र म्हस्के, बबनराव भुसारी, ॲड. हिम्मतसिंह देशमुख, अमोल अभंग, विकास नन्नवरे, संतोष पावसे, जनार्दन शेळके, दादासाहेब कोकणे, प्रसाद पटारे, रामनाथ राजपुरे, गोरक्षनाथ भेंडेकर, बाळासाहेब खरड, काशिनाथ नवले, कॉ. सुभाष लांडे, कॉ. बंशी सातपुते, रवींद्र नवले, तुकाराम मिसाळ, सुदाम महाराज शास्त्री, शेतकरी नेते अंबादास कोरडे, निवृत्ती दातीर, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, जनरल मॅनेजर रवींद्र मोटे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते संत ज्ञानेश्वर माऊली व लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी ऊस शेतीत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ‘श्री ज्ञानेश्वर ऊस उत्पादकता पुरस्कार’ देऊन गौरविण्यात आले.

उद्धव महाराज मंडलिक म्हणाले, ‘‘वैकुंठवासी बंशी महाराज तांबे यांच्या सूचनेवरून घुले पाटील साहेबांनी या साखर कारखान्याला माऊलींचे नाव दिले. वारकरी संप्रदायातील संत-महंतांना बोलावून कार्यक्रमात सहभागी करून घेण्याची परंपरा स्व. घुले पाटील यांनी सुरू केली. तीच परंपरा ज्ञानेश्वर उद्योग समूहाचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील व माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांनी आजही सुरू ठेवली आहे. त्याबद्दल उद्योग समूहाचे मनापासून धन्यवाद.’’

‘‘दुष्काळाचे संभाव्य संकट समोर असल्याने शेतीबरोबरच घरातील व्यवस्थापनही काटकसरीने करावे लागेल. ‘पाणी आणि पैसा’ जपून वापरावा. संकट निर्माण होण्यापूर्वी चिंतन केले तर पश्चात्तापाची वेळ येत नाही. चिंतेत जायचे नाही, तर चिंतनातून मार्ग काढायचा, हे संत परंपरेने शिकविले आहे. कोणत्याही क्षेत्रात हळूहळू प्रगती होत असते; त्यासाठी धीर धरावा लागतो. ज्ञानेश्वर उद्योग समूहाची मोठ्या उमेदीने वाटचाल सुरू असून सर्वांनी त्यास साथ व पाठबळ द्यावे,’’ असेही त्यांनी सांगितले.

**शासनाने साखर उतारा घट अनुदान द्यावे : नरेंद्र घुले पाटील**

अध्यक्षस्थानावरून बोलताना नरेंद्र घुले पाटील म्हणाले, ‘‘दुष्काळी परिस्थितीमुळे एकरी ऊस उत्पादन तसेच साखर उत्पादनात घट होणार आहे. त्यामुळे शासनाने साखर उतारा घट अनुदान द्यावे. शेतीला पूर्णवेळ वीज देता येत नसेल तर वीजबिल व शेतीकर्ज माफ करावे तसेच चारा तगाई द्यावी. जायकवाडी व मुळा धरणाच्या पाण्यावर परिसरातील शेतकऱ्यांचा पहिला हक्क आहे.’’

‘‘जिल्हा बँकेच्या माध्यमातून माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांनी शेतकरी बांधवांना पाइपलाइनसाठी कर्ज उपलब्ध करून दिले आहे. श्रमाला प्रतिष्ठा देणारा आणि मनोबल उंचावणारा हा कार्यक्रम आहे. शेतकऱ्यांनी प्रतिकूल परिस्थितीत योग्य नियोजन करून जास्तीत जास्त ऊस उत्पादन घेण्याचे नियोजन करावे. सर्वांच्या सहकार्याने आगामी हंगाम यशस्वीपणे पूर्ण करू,’’ असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**ऊसाला प्रतिटन ५०० रुपये अनुदान द्यावे : पांडुरंग अभंग**

माजी आमदार पांडुरंग अभंग म्हणाले, ‘‘दुष्काळी परिस्थितीमुळे उसाची पुरेशी वाढ झालेली नाही. त्यातच हुमणी रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने एकरी ऊस उत्पादन कमी होऊन साखर उताऱ्यात एक ते दीड टक्का घट येण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने ऊसाला प्रतिटन ५०० रुपये अनुदान द्यावे.’’

कार्यक्रमास जनार्दन पटारे, अरुण लांडे, सुधाकर लांडे, रामजी आंधळे, दादासाहेब गंडाळ, सखाराम लव्हाळे, विष्णूपंत जगदाळे, बाळासाहेब मरकड, रामभाऊ जगताप, भावराव भोंगळे, अजित मुरकुटे, डॉ. शिवाजी शिंदे, अशोक वायकर, राजेंद्र चिंधे, डॉ. संतोष फुलारी, सोपान महापूर, वैभव नवले, भाऊसाहेब आगळे, शिवाजीराव गवळी, मारुतराव घुले पतसंस्थेचे अध्यक्ष बबनराव धस, कामगार संचालक सुखदेव फुलारी, कामगार संघटनेचे सचिव संभाजीराव माळवदे, ॲड. बाळासाहेब शिंदे, भानुदास कावरे, अंबादास कळमकर, हरिभाऊ नवले, कुमार नवले, भारत गुंजाळ, ॲड. रविंद्र गव्हाणे, अनिल मडके, ताहिर पटेल, बाबासाहेब लांडे, हनुमान पातकळ, मंगेश थोरात, कुंडलीक घोरताळे, विजयराव देशमुख, आशुतोष डहाळे, सुनील काकडे, बाजीराव मुंगसे, कारभारी चेडे, लक्ष्मण बनसोडे, बबन भानगुडे, शरद वाकचौरे, हुकुमबाबा नवले, राजू परसय्या, ज्ञानदेव दहातोंडे, दत्तात्रय खाटीक, संजय कर्डिले, राजेंद्र पाटील, दत्तात्रय विधाटे, संभाजी ठाणगे, भावराव आगळे आदी उपस्थित होते.

कारखान्याचे उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संचालक अशोकराव मिसाळ यांनी आभार मानले.




### श्री ज्ञानेश्वर ऊस उत्पादकता पुरस्काराचे मानकरी

■ लताबाई भाऊसाहेब चौधरी (माळी चिंचोरा), संजय पाराजी दहातोंडे (चांदा), एकनाथ रामचंद्र भोईटे (भानसहिवरा), सुनीता भागचंद साळवे (मक्तापूर), कडूबाई विजय डोईफोडे (रांजणगाव), अंबादास काशिनाथ निकम (देवगाव), सुनील जगन्नाथ शिंदे (मंगळापूर), रवींद्र शांतवन नरोडे (मंगळापूर), दिगंबर प्रल्हाद रिंधे (जेऊर), संजय निवृत्ती कचरे (कुकाणा), अरुण बाबासाहेब शिंदे (गोपाळपूर), मिराबाई आसाराम गोरे (रामडोह), मुक्ताबाई सिताराम पुंड (तरवडी), शरद ज्ञानदेव क्षीरसागर (तरवडी), गणपत मोहन शित्रे (ढोरसडे, ता. शेवगाव), वैभव पांडुरंग जमधडे (भातकुडगाव, ता. शेवगाव), काकासाहेब बाबासाहेब गाढे (आखातवाडे, ता. शेवगाव), आदिनाथ मच्छिंद्र गरड (ढोरजळगाव, ता. शेवगाव), रुक्मिणी प्रभाकर नजन (खुंटेफळ, ता. शेवगाव), भास्करराव रामभाऊ शिंदे (दहिफळ, ता. शेवगाव), मधुकर गेनुजी वावरे (वरूर बुद्रुक, ता. शेवगाव), ओमप्रकाश रामनारायण बाहेती (एरंडगाव, ता. शेवगाव), चंद्रसेन मल्हारराव राजेभोसले (मुंगी, ता. शेवगाव), अमोल सुधाकर गव्हाणे (मुंगी, ता. शेवगाव), रामेश्वर मोहन गलांडे (हातगाव, ता. शेवगाव), गोवर्धन विष्णू ढेसले (बोधेगाव, ता. शेवगाव), बाळासाहेब जनार्धन लोखंडे (सुलतानपूर बुद्रुक, ता. शेवगाव), माणिक भानुदास जाधव (भावीनिमगाव, ता. शेवगाव), संभाजी मोहनीराज पवार (नेवासा खुर्द, ता. नेवासा), राजेंद्र त्रिंबक बडधे (शेवगाव), शकुंतला शिवाजी म्हस्के (जेऊर), अभिजीत नानासाहेब घुले (रांजणी, ता. शेवगाव), रवींद्र आबासाहेब काळे (तेलकुडगाव), विकास रोहिदास चावरे (जळके बु., ता. नेवासा) यांचा सन्मान करण्यात आला.

## वीरभूमी गणपती बाप्पा मोरया ‘सेल्फी विथ गणेशा’



■ वीरभूमी-‘सेल्फी विथ गणेशा’ : अन्वित अभिजित सातपुते, रा. अकोले



■ वीरभूमी-‘सेल्फी विथ गणेशा’ : चि. रुद्र सोमनाथ घोंगडे, शेवगाव, जि. अहिल्यनगर



■ वीरभूमी-‘सेल्फी विथ गणेशा’ : गजानन घरत व परिवार, रा. खारकोपर, पनवेल



■ वीरभूमी-‘सेल्फी विथ गणेशा’ : नितीन गरड व परिवार, स्वप्नसदन अपार्टमेंट गणेश मंडळ, दौंड



■ वीरभूमी-‘सेल्फी विथ गणेशा’ : मंजुश्री मोताळे, विनायक मोताळे व संजय मोताळे, रा. उरुळी कांचन, जि. पुणे



■ वीरभूमी-‘सेल्फी विथ गणेशा’ : विलासराव गोडबोले, स्वाती गोडबोले, विनोदकुमार गांधी, रा. विरभद्रनगर, बाणेर, पुणे

तुमचाही सेल्फी पाठवा आणि उद्याच्या पानात स्वतःला पहा!

येथे पाठवा आपले फोटो

९४२०८०२१४५

mahadevdale@gmail.com

www.veerbhuminews.com
WhatsApp contact

व्हाट्स ॲप क्यू आर कोड स्कॅन करा.